।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४२

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि ८ जून २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक २४ वा

## हिंदू समाजाचे अपेक्षित काम सरकार करणार- ना.नितेश राणे

### सांगोला येथे वीरशैव लिंगायत समाजाच्या बहुउद्देशीय सभागृहाचे भूमिपूजन संपन्न



सांगोला : हिंदू राष्ट्रमध्ये आम्हा हिंदू लोकांना विरोध करण्याची कोणाचीही ताकद नाही. हिंदू समाजाला जे अपेक्षित काम आहे ते हिंदुत्ववादी विचाराचे सरकार म्हणून आमचे सरकार करणार आहे.सभागृह म्हणजे हिंदु समाजाच्या दृष्टीकोनातून महत्वाचा विषय आहे. आज सभागृहाच्या भूमीपूजनासाठी जसे आम्ही सगळे एकत्र आलो त्याचप्रमाणे लवकरच भाव्या उद्घाटनासाठी आम्ही सगळेजण एकत्र येणार असून माझे सह्ले त्यांच्या हितचेच असल्याचे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील वीरशैव लिंगायत समाजाच्या बहुउद्देशीय सभागृहाच्या भूमिपूजन सोहळा मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी आमदार श्री.सचिन कल्याणशेट्टी, भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.चेतनसिंह केदार, हिंदू जागरण मंचाचे जिल्हा संघटक देवभाऊ कोकाटे, अमरदादा लोखंडे, तुकाराम गुळमिरे, शिवाजीअण्णा गायकवाड, महेश गुळमिरे, आनंदकाका घोंगडे, चंदन होनराव, संजय केंडवळे, मनोज उकळे, संदेश पलसे, दिपक खटकाळे,अरविंद केदार, उत्तम ढेले, जगदीश बाबर, मानस कमलापूरकर, ॲड.सरगर, शेखर चाळशी, किरण बुर्ले, आकाश घोंगडे यांच्यासह लिंगायत समाज बांधव,हिंदू बांधव तसेच अक्कमहादेवी महिला संघटनेच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपूजन पुजेचा मान सौ व श्री.राहुल पाटणे यांना मिळाला.

उद्धव ठाकरे गटाला खिंडार पाडण्यासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर राबवले जात आहे. यावर बोलताना ना.नितेश राणे म्हणाले, उद्धव ठाकरे गटाचे कोण फोडायचे असेल तर ऑपरेशन टायगर नाही तर ऑपरेशन पेंग्विन करायला पाहिजे, टायगर आणि उद्धव ठाकरेंचा काहीही संबंध नाही त्यामुळे ऑपरेशन पेंग्विन हेच नाव योग्य असेल असा टोला लगावत उद्धव ठाकरे यांच्यासाठी ऑपरेशन टायगरचे नाव बदलून ऑपरेशन पेंग्विन हे नाव ठेवण्याचा अप्रत्यक्षपणे सल्ला मंत्री नितेश राणे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला.

## दिशा हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू - डॉ.सचिन गवळी



सांगोला : सांगोला शहरातील कडलास नाका येथील दिशा हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरु झाली असून याचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन डॉ. सचिन गवळी यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाची ही एक आरोग्य योजना आहे, जी राज्यातील सर्व कुटुंबांना परवडणाऱ्या आरोग्य सेवा पुरवते. या योजनेत, प्रति कुटुंब प्रति वर्षी ५ लाख आरोग्य संरक्षण, तसेच महाराष्ट्र शासनाच्या आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंतचे संरक्षण मिळते. ही योजना सर्वसमावेशक असून, विविध प्रकारच्या आजारांवर उपचार, शस्त्रक्रिया आणि आवश्यक वैद्यकीय सेवा यांमध्ये मदत करते.

यावेळी डॉ.सचिन गवळी यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, सांगोला येथील दिशा हॉस्पिटलमध्ये पूर्वीपासूनच मुख्यमंत्री साह्यता निधी योजना सुरु असून या योजनेअंतर्गत सांधा रोपण शस्त्रक्रिया साठी निधी, सर्व मेडिक्लेम कॅशलेस सुविधा असून या हॉस्पिटल मध्ये सर्व प्रकारच्या फॅक्चर, ॲक्सिडेंट आणि ट्रॉमा केअर, आर्थोस्कोपी (खांदा, गुडघा निसटणे उपचार) प्लास्टिक सर्जरी, कृत्रिम सांधारोपण शस्त्रक्रिया, स्पइन सर्जरी, जबड्याची शस्त्रक्रिया, मणक्याचे सर्व आजाराचे निदान व उपचार केले जातात असेही सांगितले.

## सांगोला ट्रॉमा सेंटर तात्काळ सुरु करा

### खा.धैर्यशील मोहिते पाटील यांची आरोग्यमंत्र्यांकडे मागणी



सांगोला : सांगोला, येथे बांधकाम पूर्ण झालेल्या ट्रॉमा सेंटरमध्ये अत्यावश्यक यंत्रसामग्री उपलब्ध करून देऊन व कर्मचारी भरती करून हे केंद्र तात्काळ सुरु करावे,याबाबत राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मागणी केली.

सांगोला येथे उभारण्यात आलेल्या ट्रॉमा सेंटरची इमारत सुसज्ज असूनही अद्याप ते कार्यान्वित करण्यात आलेले नाही. आवश्यक यंत्रसामग्री, डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि इतर तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे हे महत्त्वाचे ट्रॉमा निष्क्रिय स्थितीत आहे. सांगोला तालुक्यातून नागपूर-रत्नागिरी आणि इंदापूर-जत हे दोन प्रमुख महामार्ग जात असल्यामुळे या भागातील वाहतूक प्रचंड आहे.

परिणामी, अपघातांची संख्या वाढण्याची शक्यता कायम असते. अपघातग्रस्त रुग्णांना वेळेत उपचार मिळणे अत्यंत आवश्यक असून, हे ट्रॉमा सेंटर नागरिकांसाठी जीवनदायी ठरू शकते. सध्या अपघातग्रस्त रुग्णांना सोलापूर, पंढरपूर, मिरज, येथे हलवावे लागते, ज्यामुळे वेळेवर उपचार मिळत नाहीत आणि जीवितहानी होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे बांधकाम पूर्ण झालेले सांगोला ट्रॉमा सेंटर तातडीने कार्यान्वित करून परिसरातील नागरिकांना आधुनिक आणि तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी आग्रही मागणी खासदार मोहिते पाटील यांनी केली आहे.

## ऑपरेशन सिंदूरमध्ये दणदणीत विजय

### तिन्ही दलाच्या सन्मानार्थ सांगोल्यात तिरंगा रॅली संपन्न



सांगोला : ऑपरेशन सिंदूर मध्ये भारतीय संरक्षण दलाच्या तिन्ही दलाच्या सैनिकांनी जे शौर्य,धाडस दाखवून दणदणीत विजय संपादन केला व आपला पराक्रम सर्व जगाला दाखवून दिला याबद्दल त्यांच्या सन्मानार्थ जय जवान माजी सैनिक सेवाभावी संस्था, सांगोला तसेच तालुक्यातील सर्व आजी-माजी सैनिक व समस्त नागरिक यांनी भव्य तिरंगा रॅली काढली होती.

तिरंगा रॅलीची सुरुवात वासुद चौक सांगोला येथून करण्यात आली. तिरंगा रॅली प्रसंगी सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. जय जवान माजी सैनिक सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी कॅप्टन धनाजी पवार यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली व संस्थेचे उपाध्यक्ष सुभेदार मेजर रविकांत मराळ यांनी कार्यक्रमाची सांगता तसेच सेवारत सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी सुंदर शब्दात मनोगत व्यक्त केले व प्रथम भारतीय स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या महात्म्यांना तसेच स्वातंत्र्यानंतर आत्तापर्यंत भारत मातेच्या संरक्षणासाठी शहीद झालेल्या जवानांना ०२ मिनिट मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर याप्रसंगी सैन्यदलात सेवारत असणाऱ्या व सध्या सुट्टीवर आलेल्या सैनिकांचा जय जवान माजी सैनिक सेवाभावी संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच प्रत्येक गावातून आलेल्या माजी सैनिकांविषयी डॉ.निकिताताई बाबासाहेब देशमुख यांनी आपले मनोगत खूप सुंदर शब्दात व्यक्त केले तसेच अरविंद केदार यांनी सैनिकांविषयी व माजी सैनिकांविषयी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी वासुद, अकोला, चिनके, पाचेगाव, हनुमंतगाव, मानेगाव, बुरंगेवाडी, जवळा, निजामपूर, सोनंद, हंगिरगे, मांजरी, बामणी, कडलास, डोंगरगाव, वाटंबरे, खर्डी, मंगळवेढा, कोळा, वाढेगाव, राजापूर इत्यादी गावाहून माजी सैनिक आले होते. सर्वात शेवटी मान्यवरांचे व आलेल्या सर्व माजी सैनिक देशप्रेमी, समस्त नागरिक, व सेवारत सैनिक यांचे आभार संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील मेजर यांनी मानले व तिरंगा रॅलीची सांगता केली.

# पतीवरील प्रेमाचे प्रतीक : वट पौर्णिमा

वट पौर्णिमा ज्याला वट सावित्री व्रत देखील म्हणतात. हा महाराष्ट्र, गोवा या पश्चिम भारतीय राज्यांमध्ये विवाहित महिलांनी साजरा केलेला हिंदू उत्सव आहे. तात्विक दृष्टिकोनातून, वटवृक्ष दीर्घायुष्य आणि अमरत्वाचे प्रतीक म्हणून देखील स्वीकारले जाते. वटवृक्ष हे ज्ञान आणि निर्वाणाचेही प्रतीक आहे. भगवान बुद्धांना याच झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले. म्हणूनच पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करणे हा या व्रताचा भाग झाला. कथा कर्माबरोबरच स्त्रिया उपवास करतात आणि पूजा करतात आणि परिक्रमेदरम्यान वटवृक्षाभोवती सुताचे धागे गुंडाळतात. एक विवाहित स्त्री तिच्या पतीवरील प्रेमाचे प्रतीक झाडाभोवती एक औपचारिक धागा बांधून दर्शवते. या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. वटपौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करतात. पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने वडाचे महत्त्व विशेष असल्याने त्याच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हा ही पूजेचा एक हेतू आहे. वट सावित्री व्रत शुभ आणि संतान प्राप्तीसाठी मदत करणारे मानले जाते. भारतीय संस्कृतीत हे व्रत आदर्श स्त्रीत्वाचे प्रतीक बनले आहे. या व्रताच्या तिथीबाबत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. स्कंद पुराण आणि भविष्योत्तर पुराणानुसार ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेला हे व्रत करण्याचा नियम आहे, तर निर्णयामृत वगैरेनुसार ज्येष्ठ महिन्यातील अमावास्येला उपवास करण्याचे सांगितले आहे.

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी पासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्र व्रत करावे असे सांगितले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल त्यांनी फक्त पौर्णिमेलाच उपवास करावा. सावित्रीसह ब्रम्हदेव ही या व्रताची मुख्य देवता असून सत्यवान-सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा, नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी, तिच्यावर




सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्यात मग त्यांची षोडशोपचारे पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्ये द्यावीत, मग सवित्राची प्रार्थना करावी. पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनींसह सावित्रीची कथा ऐकावी. या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीने आंतरिक गुणांची पारख करून निवडलेल्या वरास आई-बाप आणि देवगुरू यांच्या विरोधाला डावलून माळ घातली व पतीचे प्राण वाचवण्याचे अवघड काम चिकाटीने, दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि चातुर्याने करून दाखविले. योगी अरविंद यांनी आध्यात्मिक परिभाषेतून सावित्रीचे महत्त्व सांगणारे 'सावित्री' नावाचे महाकाव्य लिहिले आहे.

वटवृक्षाचे पूजन आणि सावित्री-सत्यवान कथेचे स्मरण करण्याच्या विधीमुळे हे व्रत वट सावित्री म्हणून प्रसिद्ध झाले. भारतीय संस्कृतीत सावित्रीला ऐतिहासिक पात्र मानले जाते. सावित्री म्हणजे वेदमाता गायत्री आणि सरस्वती. सावित्रीचा जन्महीं विशेष परिस्थितीत झाला. भद्रा देशाचा राजा अश्वपती यांना मूलबाळ नव्हते असे म्हणतात. त्यांनी संततीप्राप्तीसाठी मंत्रोच्चारांसह दररोज एक लाख अर्पण केले. हा क्रम अठरा वर्षे चालू राहिला. यानंतर सावित्री देवी प्रकट झाली आणि वरदान दिले की, 'राजन, तुझ्या पोटी एक तेजस्वी मुलगी होईल'. सावित्रीदेवीच्या कृपेने जन्माला आल्याने मुलीचे नाव सावित्री ठेवण्यात आले. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. सावित्री उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. सावित्रीने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहित असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली.

सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून सावित्री व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता सावित्री त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता-तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला व सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा सावित्रीस परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासू-सासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. सर्व पवित्र वृक्षांत वटवृक्षाचे आयुष्य जास्त असून पारंब्यांनी त्याचा विस्तारही खूप होतो. अशा वटवृक्षाची पूजा करून स्त्रिया 'मला व माझ्या पतीला आरोग्यसंपन्न दीर्घायुष्य लाभू दे, धनधान्य व मुले-नातू यांनी माझा प्रपंच विस्तारित व संपन्न होऊ दे', अशी प्रार्थना करतात.

सन् आहे सौभाग्याचा, बंध आहे अतूट नात्याचा ।
या शुभदिनी पूर्ण होवोत तुमच्या सर्व इच्छा ।।
वट पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!



-प्रविण बागडे,नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष सांगोला ते जवळा रस्त्याची दुरावस्था

## रस्ता दुरुस्त करण्याची नागरिकांची मागणी

सांगोला : सांगोला ते जवळा रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाने वेळीच लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी विद्यार्थी आणि ग्रामस्थांतून होत आहे.

सांगोला शहराला जोडणारा रस्त्याची दुरावस्था झाली असून अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. या मार्गावरील दहा गावातील नागरीकांना उद्योग, व्यवसाय, शाळा, नोकरी, रुग्णालय महाविद्यालयीन शिक्षणासाठी सांगोला शहरात यावे लागते. अशा या खड्डेमय झालेल्या रस्तावरुन जीव मुठीत घेत जीवघेणा प्रवास करावे लागत असून रात्रीच्या वेळी खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने सातत्याने अपघात होत आहेत.

सांगोला ते जवळा या १४ किमी अंतरावर २ किलोमीटरच्या अंतरावरती खड्डे पडल्यामुळे वाहन चालवत असताना चालकांना कसरत करावी लागत आहे. रस्ता वर्दळीचा असून रस्त्याने अनेकजण प्रवास करतात. नेहमीच हजारो वाहने या रस्तावरून जात येत असल्याने खड्ड्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. शिवाय रस्ता अनेक ठिकाणी अरुंद असल्यामुळे दोन वाहने खड्ड्यामुळे व्यवस्थीत पास होऊ शकत नाहीत. एक खड्डा चुकवित असताना दुसऱ्या खड्ड्यात वाहन जावून होणारा नाहक त्रास सहन करीत जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याने नागरिक, वाहन चालक अन प्रवाशातून नाराजी दिसून येत आहे. संबंधित विभाग, लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून रस्ता दुरूस्त करण्याची मागणी विद्यार्थी आणि ग्रामस्थांतून होत आहे.

# सांगोला नगरपरिषदेतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण




सांगोला : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सांगोला नगरपरिषदेमार्फत तालुका क्रिडा संकुल येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सांगोला विधानसभा सदस्य आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख व सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी वृक्षारोपण कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व लावण्यात आलेल्या रोपांची जबाबदारीने जोपासना करावी सुचित केले.तसेच या वृक्षारोपण कार्यक्रमास फॅबटेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

यावेळी सांगोला नगरपरिषदेचे अधिकारी श्री.सचिन पाडे, श्री.रोहीत गाडे, श्री.विनोद सर्वगोड , श्रीम. प्रियांका पाटील, श्रीम.अस्मिता निकम, श्री.महेश रजपूत, श्री.करण सरोदे, श्री.प्रभाकर कांबळे, श्री. योगेश गंगाधरे व इतर कर्मचारी वर्ग यांनाही वृक्षारोपण केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.आरिफ मुलाणी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४२ वे अंक-२८ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला येथे अनोख्या चोरी; दोन महिलांच्या हातातील पाटल्या कट करुन पळविल्या चोरट्यांने



सांगोला : एस टी बस मधुन गर्दीतुन उतरत असताना गर्दीचा फायदा घेवून सव्वा लाख रुपये किंमतीची पावणे तीन तोळे वजनाची सोन्याची पाटली अज्ञात चोरट्यांनी कट करुन पळवून नेली असल्याची घटना सांगोला एस.टी बस स्थानकावर २ जून रोजी सायंकाळी ५ वाजता घडली. त्याचप्रमाणे दि.०३ जून २०२५ रोजी एस.टी.बस मध्ये चढत असताना उजवे हातातील दोन तोळे वजनाची सोन्याची पाटली पळवून नेली असून महिलांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असून चोरीची फिर्याद भाग्यश्री पाटणे (वय ५८ वर्षे, रा.कुंभार गल्ली सांगोला) यांनी सांगोला पोलीस स्टेशनला दिली आहे.

दि.०२ जून २०२५ रोजी भाग्यश्री पाटणे या पती सोबत मंगळवेढा येथे सकाळी ११ वाजणेचे सुमारास गेले होते. त्यानंतर सेवानिवृत्तीचा कार्यक्रम करून सांगोला येथे येण्यासाठी बसमध्ये बसून साधारण सायं. ५ वाचे सुमारास बस स्थानक सांगोला येथे आले होते. त्यावेळी गर्दीतुनच बस मधून उतरून तेथून चालत राहते घरी आले असता उजवे हातातील सोन्याची पाटली नसल्याचे दिसून आले म्हणून चालत आलेले रोडवर व इतर ठिकाणी शोधा शोध केली परंतू ती मिळून आली नाही तेव्हा आमचे निदर्शनास आले की, कोणीतरी अज्ञात चोरट्याने सांगोला एस टी स्टँड येथे बस मधून उतरत असताना गर्दीचा फायदा घेवून उजवे हातातील सोन्याची पाटली ही कशाने तरी कट करुन चोरुन घेवून गेलेले आहेत.

त्याचप्रमाणे सांगोला शहरातील राहणारे सिंधु रामचंद्र भोकरे रा.भारतगल्ली, सांगोला यांचेही दि.०३ जून रोजी सकाळी ११.३० वाजणेचे दरम्यान एस टी बस मध्ये चढत असताना उजवे हातातील २ तोळे वजनाची सोन्याची पाटली कशानेतरी कट करुन चोरी केले असल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

# सांगोला पोलिस स्टेशनला बदलून आले ३१ पोलिस कर्मचारी तर केवळ ८ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

सांगोला : सांगोला सांगोला पोलिस स्टेशनला पाच वर्षे व त्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या केवळ ८ पोलिस कर्मचाऱ्यांच्या जिल्ह्यातील इतर पोलिस स्टेशनला बदली झाल्या आहेत, तर सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलिस स्टेशनला ५ वर्षे सेवा पूर्ण झालेले तसेच विनंती बदलीने असे एकूण सुमारे ३१ पोलिस कर्मचारी सांगोला पोलिस स्टेशनला बदलून आले आहेत.

सांगोला पोलिस स्टेशनचे पो.हे.हनुमंत माळी यांची सोलापूर तालुका, पो. हे. अभिजीत मोहोळकर (करमाळा), पो.हे. धनंजय आवताडे (मंगळवेढा), पो.ना.कृष्णा पखाले व इम्रान तांबोळी (पंढरपुर शहर), पो. कॉ. गणेश कुलकर्णी (पंढरपूर तालुका), पो. कॉ. संभाजी शिंदे (पंढरपूर मंदिर समिती), पो. ह. प्रशांत गायकवाड (माढा) याठिकाणी बदली झाली आहे. महिला पो. शि. हर्षा बनसोडे यांना एक वर्षाकरिता सांगोला पोलिस स्टेशनला मुदतवाढ मिळाली.

तसेच पो.कॉ.अमोल वाडकर, उमेश डोळस, दीपक लेंगरे, बंड बनकर, अनिल येडगे व संतोष इंगोले, संकेत गोरे, धनंजय जाधव, मच्छिंद्र राजगे, ताजुद्दीन मुजावर, सर्जेराव वाघमोडे, सतीश धुमाळ, शिवाप्पा बिराजदार, दीपक शिंदे, स्वप्नील पवार, शिवाजी आवटे, सोमनाथ भोसले यांची सांगोला पोलिस स्टेशनला बदली झाली. विनंती बदलीनुसार विशाल घाडगे, मच्छिंद्र माळी, सुनील मंडले, धीरज कुमार लवटे, नीलेश ढोबळे, रितेश इंगळे, अशोक मासाळ, काशिनाथ कोळी, सैफन पठाण, किरण राऊत, सहायक फौजदार अनिल गडदे, सहायक फौजदार संजय राऊत, संभाजी आगलावे असे एकूण ३० पोलिस कर्मचारी सांगोला पोलिस स्टेशनला बदलून आले आहेत.

# महावितरण कंपनीच्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना पगार न मिळाल्याने उपासमारीची वेळ

सांगोला : सांगोला तालुक्यातील महावितरण कंपनीच्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना गेल्या तीन महिन्यापासून पगार न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. सांगोला तालुक्यातील महावितरण कंपनीकडे सांगोला आणि हातीद उपविभागा अंतर्गत बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगार म्हणजेच प्रकाशदूतांची नेमणूक करण्यात आली आहे. सांगोला आणि हातीद या दोन उपविभागात मिळून बाह्यस्त्रोत लाईनस्टाफ ६१ आणि बाह्यस्त्रोत ऑपरेटर ५५ इतक्या कंत्राटी कामगारांची नेमणूक करण्यात आली आहे. या कामगारांना गेल्या सुमारे तीन महिन्यापासून काम करूनही पगार मिळालेला नाही.

दिवस रात्र ऊन वारा पाऊस याची कोणत्याही प्रकारची तमा न बाळगता हे प्रकाशदूत कामासाठी नेहमी सज्ज असतात. या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सुमारे तीन महिन्यापासून पगार न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

महावितरण कंपनीत इतर कायम कर्मचाऱ्यांचा पगारी महिना संपायच्या आत म्हणजेच प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला पगार केला जातो. या कायम कर्मचाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारे परंतु बाह्यस्त्रोत अर्थात कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांच्या श्रमाचा पगार वेळेवर का दिला जात नाही याचे कोडे पडले आहे. बाह्यस्त्रोत पद्धतीने कंत्राटी प्रकाशदूत भरण्यासाठी जी ए डिजिटल दिल्ली या कंपनीला ठेका देण्यात आला आहे. संबंधित कंत्राटी कामगार या ठेकेदार कंपनीच्या कर्मचाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करतात.मात्र संबंधित ठेकेदार कंपनीचे कर्मचारी त्यांचा फोन घेत नाहीत.

एखाद्या वेळेस फोन घेतलास तर पगाराबाबत विचारणा करणाऱ्या कंत्राटी कामगाराला तुला कामावरून काढून टाकले जाईल अशी धमकी देतात.महावितरण कंपनीमध्ये दर्जेदार सेवा तसेच अखंडित वीजपुरवठा आणि शंभर टक्के वीज बिल वसुली करणे आदी कामे हे कंत्राटी कामगार प्रामाणिकपणे करताना दिसतात. असे असूनही त्यांच्या कामाचा मोबदला त्यांना वेळेवर दिला जात नाही.त्यांच्या पगाराबाबत ना ठेकेदार कंपनीला काळजी ना महावितरण च्या अधिकाऱ्यांना काळजी आहे.त्यामुळे या कंत्राटी कामगारांची अवस्था 'आई जेवू देत नाही अन् बाप भीक मागू देत नाही' अशीच झाली आहे. अशा परिस्थितीमध्ये महावितरण प्रशासनाने वेळीच लक्ष घालून बाह्य स्रोत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा पगार तात्काळ करावा व संवेदना शून्य मजूर ठेकेदार कंपनीला वेळीच जाब विचारून त्यांच्या मजूर वृत्तीला चाप लावावा अशी मागणी कंत्राटी कर्मचाऱ्यांमधून केली जात आहे.

# सांगोल्याच्या लेकीचे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश

सांगोला : सांगोल्यातील कु. श्रावणी चंद्रशेखर देशपांडे हिने कर्नाटक मधील शृंगेरी येथील केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय, राजीव गांधी परिसर या विद्यापीठातून संस्कृत विषयात शिक्षाशास्त्री (बी.एड.) पदवी परीक्षेत ८९ टक्के गुण मिळवून विशेष प्राविण्यासह यश प्राप्त केले. यापूर्वी तिने तिरुपती येथील शिक्षाशास्त्री राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालयातून संस्कृत व्याकरणशास्त्रामधे आचार्य (एम ए) ही पदवी संपादन केली. तसेच प्राकशास्त्री(११वी -१२ वी) मध्ये तिला सुवर्ण पदक मिळाले होते. याशिवाय तिने काशी येथील अखिल भारतीय शास्त्रीय स्पर्धा (मार्च २०२३) या वर्षी आयुर्वेदशास्त्रावर झालेल्या भाषणस्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील कांस्यपदक मिळवले होते. तिचे शालेय शिक्षण सांगोला विद्यामंदिर प्रशाला सांगोला येथे झाले.

संस्कृतची आवड असल्यामुळे त्यामधील विषयाच्या अभ्यासाला वाहून घेतले. तिच्या या यशाबद्दल शिक्षक, नातेवाईक, ग्रामस्थ, यातून अभिनंदन होत आहे. तसेच श्रावणी तिच्या यशाचे श्रेय तिची आई कै.स्नेहा देशपांडे यांना देते. सांगोला येथील देशपांडे गल्लीत राहणारे वरिष्ठ बँक अधिकारी श्री.चंद्रशेखर देशपांडे यांची सुकन्या आहे. संस्कृत विषयातील पदव्युत्तर शिक्षण परराज्यात जाऊन घेणारी श्रावणी ही सांगोला तालुक्यातील पहिली विद्यार्थिनी आहे.

# सांगोला फॅबटेक मधील कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची हैद्राबाद इंडस्ट्रीलला भेट

सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला मधील कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरिंग विभागातील तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची हैद्राबाद येथील व्हेक्टर इंडिया कंपनीला सदिच्छा भेट दिली.

कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरिंग विभागातील ४५ हून अधिक विद्यार्थ्यांची इंडस्ट्रील भेट आयोजित करण्यात आली होती. यामध्ये हैद्राबाद येथील व्हेक्टर इंडिया या कंपनीला भेट देऊन विद्यार्थ्यांनी कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली.

यादरम्यान इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन च्या नॅशनल रिमोट सेनसिंग सेंटर ला भेट देऊन विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली. ही भेट यशस्वी करण्यासाठी विभाग प्रमुख डॉ. तानाजी धायगुडे, प्रा.अभिमान होकंळस, प्रा. अतिश जाधव, प्रा.माधुरी सुरवसे, प्रा.कोमल मस्के, प्रा.ज्योती कराडे, सचिन गडहिरे आदींसह कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरींग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

निर्भिड व सडेतोड बातम्या नियमित वाचा...

साप्ताहिक माणदेश वार्ता

# भावपूर्ण श्रध्दांजली !!!

## पंधरावे पुण्यस्मरण

देव घरातल्या दिव्या,रात नाही रे सरली,वात फुलायच्या आधी,
कशी विझुनिया घेली,जाण्या पैलतिरी आधी,कशी नाव उलटली,
मैदानाच्या सवंगडया,खेळी अपुरी राहिली दुःख अंतरी मावेना,
अश्रु दाटले नयनी...!!!







**कै. मारूती शिवाजी सोनवणे**

(मृत्यू दिनांक ४ जून २०१०)

## शोकाकूल

श्रीमती लता मारूती सोनवणे

श्रीमती नलिनी विठ्ठल पोळ
श्रीमती शोभा राजाराम कटके
श्रीमती निर्मला भागवत सोनवणे

ॲड.श्री.रोहित मारूती सोनवणे
श्री.शैलेंद्र सुर्यकांत पोळ
श्री.बाबासाहेब पांडूरंग चौधरी
श्री.विश्वजित भागवत सोनवणे
कु.अमरजित भागवत सोनवणे
चि. मयुर,चि.क्षितीज,शौर्य



सौ.शितल रोहित सोनवणे
सौ.संध्याराणी शैलेद्र पोळ
सौ.श्रध्दा बाबासाहेब चौधरी
सौ.साधना विश्वजित सोनवणे
कु.पूजा मारूती सोनवणे
चि.मंथन,नवलाई,क्रिश,शंतनू

**सोनवणे, खंदारे, कटके, पोळ, बोराडे, शिंदे, चौधरी परिवार**